**अमरावती महानगरपालिका, अमरावती**

**दिनांक ३.३.२०२३ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ६८ -** अमरावती महानगरपालिकेतर्फे खाजगी अभिकर्ता श्री.विपिन चव्हाण यांचे मार्फत चालविण्यात येत असलेला शहर बस उपक्रमाकरिता नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.

**ठराव क्रमांक ६८ -** अमरावती महानगरपालिका खाजगी अभिकर्ता श्री.विपिन चव्हाण यांचे मार्फत शहर बस उपक्रम दि.२५/०५/२०१६ रोजी पासून राबवीत आहे व तसा करारनामा त्यांचेसोबत करण्यात आला आहे. करारनामानुसार रॉयल्टी रक्कम दर महिन्याचे ७ तारखेपर्यंत अमरावती महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे.

परंतु शहर बस उपक्रम सुरु झाल्यापासून एकूण ४० शहर बसेस न आणणे,वेळापत्रकानुसार शहर बसेस न चालविणे,करारनामाचे उल्लंघन करणे इत्यादी. करिता करारनामातील SHEDULE- २ प्रमाणे त्यांना दंड आकारण्यात आला. परंतु त्यांनी दंडाची रक्कम न भरल्यामुळे त्यांची अमरावती महानगरपालिकेकडे जमा असलेली सुरक्षा ठेव रक्कम रु.५० लक्ष जप्त करण्यात आली. तसेच शहर बस अभिकर्ता यांनी नियमित कर्जाची परतफेड न केल्यामुळे कर्जाचे खाते NPA म्हणून बँकेद्वारा घोषित करण्यात आलेले आहे.

तसेच श्री.विपिन चव्हाण यांनी माहे ऑगस्ट २०१८ पर्यंत रॉयल्टी रक्कमेचा नियमितपणे अमरावती महानगरपालिकेकडे भरणा केलेला आहे. परंतु माहे सप्टेंबर २०१८ पासून त्यांनी रॉयल्टी रक्कमेचा भरणा नियमितपणे केलेला नव्हता.

सद्यस्थितीत त्यांचेकडे माहे ऑगस्ट २०१८ ते ऑक्टोबर २०१८ पर्यंतची दंड रक्कम रु.४२,०९८/- व नोव्हेंबर २०१८ ते नोव्हेंबर २०१९ पर्यंतची थकीत रक्कम रु.२३,८०,३६९/- व माहे डिसेंबर २०१९ ते दि.२१/०३/२०२० पर्यंतची रॉयल्टी रक्कम रु.१६,४९,६३३/- अद्यापही थकीत आहे. तसेच माहे डिसेंबर २०२० ते फेब्रुवारी २०२१ पर्यंतची रॉयल्टी रक्कम रु.२,४५,१५०/- व कोरोना काळानंतर दि.२४/०६/२०२१ ते जून २०२२ पर्यंत रॉयल्टी रक्कम रु.१०,४७,७०७/- थकीत आहे. तसेच माहे जुलै २०२२ ते आजतायागत अद्यापही रॉयल्टी रक्कम त्यांचेकडून अदा करण्यात आली नाही.

त्याकरिता त्यांना बरेच पत्रांनुसार वारंवार रॉयल्टी रक्कम भरण्याचे कळविले होते. परंतु अद्यापही त्यांचेकडून थकीत रॉयल्टीचा कोणताही भरणा केलेला नाही. सदर बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असून करारनामाचा भंग होत असल्यामुळे तात्काळ थकीत रॉयल्टी रक्कमेचा भरणा मनपात करावा व तसेच

करारनाम्यानुसार पूर्ण संख्येने २५ बसेस अमरावती शहरात त्वरित सुरु कराव्यात व देण्यात आलेले पत्र मिळताच दोन दिवसाच्या आत बसेस सुरु केल्याचा अहवाल कार्यशाळा विभागात सादर करावा अन्यथा करारनाम्यातील अट क्र. ८ नमूद मधील Schedule - 2 नुसार आपणास प्रती दिवस प्रती बस रु. ५०००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. याचा सुद्धा उल्लेख पत्रामध्ये करण्यात आला होता.

तसेच करारनामानुसार रु.५० लक्षची बँक ग्यारंटी अमरावती महानगरपालिकेकडे जमा असणे आवश्यक आहे. परंतु त्यांची बँक ग्यारंटी दंडात्मक कार्यवाही म्हणून सन २०१६ मध्येच जप्त केली. त्याबाबत न्यायालयीन प्रकरण सुरु असून मनपाकडे सध्या सुरु असलेल्या बस सेवेकरिता किमान रु.५० लक्ष ची बँक ग्यारंटी अमरावती महानगरपालिकेकडे त्वरित जमा करावी. याचा सुद्धा उल्लेख पत्रामध्ये करण्यात आला होता.

तसेच सर्व पत्रान्वये त्यांना वारंवार रॉयल्टी भरणेबाबत व पूर्ण क्षमतेने शहर बस सुरु करणेबाबत कळविण्यात आले. परंतु त्यांनी त्याची दखल घेतली नाही व त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे दि.०१/०९/२०२२ पासून १७ शहर बसेस सुरु असल्याचे गृहीत धरून उर्वरित ८ शहर बसेस न चालविल्याबाबत करारनाम्यातील अट क्र. ८ नमूद मधील Schedule - 2 नुसार त्यांना प्रती दिवस प्रती बस रु. ५०००/- प्रमाणे दि.१०/१०/२०२२ पर्यंत रु.१६,००,०००/- दंड आकारण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांनी त्वरित थकीत रॉयल्टी व दंड रकमेचा भरणा करावा व पूर्ण क्षमतेने शहर बस सुरु करावी. याचा सुद्धा उल्लेख पत्रामध्ये करण्यात आला होता.

तसेच अभिकर्त्याने करारनामानुसार शहर बस खरेदी करणेकरिता बँक ऑफ महाराष्ट्र शाखा,राठी नगर यांचेकडून कर्ज प्राप्त करून शहर बस खरेदी केली.सदर कर्जाची परतफेड ESCROW खाते उघडून त्यामध्ये दैनंदिन प्राप्त रक्कमेचा भरणा करून फेडण्याची जबाबदारी शहर बस अभिकार्त्याची होती. परंतु सन २०१९ पासून अभिकर्त्याने सदर खात्यामध्ये रक्कम जमा केली नाही व कर्ज सुद्धा फेडले नाही.

सबब, करारनामातील अटी व शर्तीचे वारंवार उल्लंघन होत असल्यामुळे करारनामातील अट क्र.१२.३ अन्वये कार्यवाही करण्यात येईल. याबाबत काही म्हणावयाचे असल्यास त्याबाबतचा खुलासा सात दिवसांचे आत सादर करावा किंवा विहित मुदतीत समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून आपला करार रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी याबाबत अभिकर्त्यास पत्राद्वारे कळविण्यात आले परंतु अभिकर्त्याने सादर केलेला खुलासा समाधानकारक नाही.

त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीचे वारंवार उल्लंघन होत असल्यामुळे करारनामातील अट क्र.१२.३ अन्वये तसेच न्यायालयीन प्रकरणाचे अनुषंगाने कार्यवाही करणेकरीता व करार रद्द करणे करीता मा.विधी अधिकारी यांचेकडे सदर प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

शहर बस अभिकर्ता श्री.विपिन चव्हाण यांनी वारंवार करारनामाचे उल्लंघन केल्यामुळे श्री.विपिन चव्हाण यांचेसोबतचा करारनामा रद्द करून तसेच मा.आयुक्त यांचे आदेशान्वये शहर बसेस जप्त करून सदर उपक्रमाकरिता नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत मा. आयुक्त यांनी दि.०३/०३/२०२३ रोजी मंजुरात प्रदान केली आहे. त्यामुळे नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणे बाबत मा.सर्वसाधारण सभेचे मंजुरी करिता विषय सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.